# जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कादंबरी

**प्रा. क्रांती सुधीर शिवणे,** राजश्री शाहू कनिष्ठ महाविद्यालय गडहिंग्लज.

---

सारांश

१९९० च्या ग्रामीण कादंबरी मधून जागतिकीकरणाचा झालेला प्रभाव प्रस्तुत शोधनिबंधात घेतला आहे.समाजकारण, राजकारण,अर्थकारण आणि शिक्षण यामुळे खेड्यातले बदल आणि त्यांचे नवे प्रश्न ग्रामीण लेखकांना तीव्रतेने जाणवू लागले. हीच तीव्रता लेखकांनी आपल्या कादंबरी मधून व्यक्त केली.ग्रामीण लेखन करणाऱ्या लेखकांमध्ये रा.रं.बोराडे,राजन गवस, विश्वनाथ पाटील,आनंद विंगकर,सदानंद देशमुख,विजय शिरसाठ या आणि अशा अनेक लेखकांनी नव्वदोत्तर ग्राम जीवनातील परिवर्तनाचा वेध ग्रामीण कादंबरी मधून घेतला आहे. अशा काही लिखित कादंबरी मधून जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर झालेला परिणाम आज आपण या लेखनात पाहणार आहोत.

प्रस्तावना

जागतिकीकरणाचा प्रभाव एकूणच मराठी साहित्यावर अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येतो.१९९० साली गॅट करारावर भारताने सही केली तेव्हापासून जागतिक प्रक्रिया अधिक गतिमान झाली.जपान,चीन, रशिया या राष्ट्रांना सर्व जगावर सत्ता गाजवायची आहे.जागतिक स्तरावरील व्यापार-अर्थकारण,संस्कृती,राजकारण, दहशतवाद यासारख्या घटकांनसोबत सर्वसामान्य माणसाचे जगणे असह्य झाले.या सर्वांचा परिणाम म्हणजे या सर्वांची जाणीव राखणारा एक वर्ग निर्माण झाला.आजच्या या गोंधळाचे, विस्कळीत झालेल्या नव्या वास्तवाची मांडणी करणारी कादंबरीकरांची एक पिढी या दोन अडीच दशकात पुढे आलेली दिसून येते.आज आपण जागतिकरण आणि मराठी ग्रामीण कादंबरी यांचा विचार करणार आहोत.या शोधनिबंधाचा विचार करत असताना प्रारंभी मराठी ग्रामीण साहित्याची पार्श्वभूमी परंपरा याचा थोडक्यात परामर्श घेऊ.

सदर संशोधनासाठी १९९० नंतरच्या कादंबरीत ग्रामीण जीवनातील विविध प्रश्नांबरोबरच जागतिकरणामुळे प्रभावित झालेल्या अनेक घटकांना आपल्या कलाकृतीतून शब्दबद्ध केले आहे.यामध्ये प्रामुख्याने विश्वास पाटील यांची झाडाझडती(१९९१), राजन गवस यांची कळप (१९९७)व तणकट(१९९०), गणेश आवटे यांची पाणसळ(१९९४), रा.रं बोराडे यांची इथं होतं एक गाव (१९९०), सदानंद देशमुख यांची बारोमास (२००२), लक्ष्मण गायकवाड यांची दुभंग (२००५),आनंद विंगकर यांची अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट (२०११) इत्यादी कादंबरीचा प्राथमिक स्वरूपात अभ्यास मांडलेला आहे.या कालखंडातील कादंबरीवर जागतिकरणाचा प्रभाव पडल्याचे दिसून येते.

उद्दिष्टे

१. जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर झालेला प्रभाव तपासणे. त्यासाठी ग्रामीण कादंबरी निवडून त्यावर अभ्यास करणे.

२. ग्रामीण कादंबरी मधील व्यक्ती मनावर झालेला परिणाम शोधणे.

३. कादंबरी मधील शेतकरी जीवनावर झालेला जागतिक करण्याचा परिणाम तपासणे.

जागतिकीकरण

जागतिकीकरणाचा अर्थ प्रत्येकजण आपल्या परीने घेतो. म्हणजे ज्याला ज्या गोष्टीमुळे स्वतःला फटका बसला त्या गोष्टीचा अन्वयार्थ जागतिकीकरण असा लावला जातो. जागतिकीकरण हा शब्द खूप व्यापक बनला आहे ,पृथ्वी म्हणजे जिच्यावर संपूर्ण जीवसृष्टीचे अस्तित्व आहे ती कशावर उभी आहे तर ती शेषनागाच्या फण्यावर उभी आहे ही कथा परिचित आहे. शेषनागाने डोळे उघडले की दिवस व बंद केले की,रात्र तर मान हलवली की, भूकंप अशी एक कथा आपल्याकडे सांगितली जाते. पण या कथेला मूठ- माती देण्यासाठी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी एक नवीन उपपत्ती अशी आणली की,ही पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर नसून ती श्रमिकांच्या मनगटावर उभी आहे.पृथ्वी शेषनागाच्या फण्यावरून श्रमिकांच्या मस्तकावर आली आणि त्यानंतर ती संगणकाच्या पडद्यावर आली याला जागतिकीकरण असे म्हणतात.

विचारांमध्ये आणि आचारांमध्ये सातत्याने बदल होत जाणे म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरणाचा प्रभाव एकूण सर्वच बाबींवर म्हणजे क्षेत्रावर पडलेला दिसून येतो मग त्यातून मराठी साहित्य कसे काय सुटेल?

जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण साहित्य

१९९० नंतरच्या साहित्यात बदल झाले.१०९१ साली गॅट करारावर सह्या झाल्या आणि जागतिकीकरणाला अधिक गतिमानता आली. जागतिकीकरणामुळे देशा- देशांन मध्ये स्पर्धा निर्माण झाल्या.प्रत्येक देश स्वतःला श्रेष्ठ समजून इतरांना कमी समजू लागला.याचा परिणाम भारतीय समाजावर झाला.भारतीय लोकांच्या परंपरा,श्रद्धा आणि संस्कृतीला हादरे बसू लागले.सामाजिक स्थैर्याला,सामाजिक सलोख्याला धोका निर्माण झाला. मराठी साहित्यावर जागतिकीकरणाचा फार मोठा प्रभाव पडला.साहित्यिकांच्या लेखनामध्ये मोठ्या प्रमाणात इतर भाषेचा शिरका होताना दिसून येत आहे. जागतिकीकरणाचे वारे महानगरातून ग्रामीण भागाकडे वाहू लागले.मराठी साहित्यांमध्ये ग्रामीण भागातील जन माणसांच्या जाणिवेचे विविध प्रश्न,समस्या संघर्ष व ताण-तणावांचे चित्रण कादंबरीकारांच्या लेखनातून दिसून येते.

१९९१ साली भारताने प्रत्यक्षात खाजगीकरण,उदारीकरण व जागतिकीकरण धोरणाचा स्वीकार केला. १९९१ नंतरच्या ग्रामीण जीवनातील बदलांमुळे शेतकरी,शेतमजूर,ग्रामीण कारागीर यांच्यात एक प्रकारची अस्वस्थता जाणवत होती. जागतिकरणाच्या प्रक्रियेत तो आपले स्थान आणि भवितव्याचा विचार करत होता.आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना कादंबरीकारांनी संवेदनशील मनाने टिपल्या आहेत.बहुजनांची सर्व क्षेत्रात झालेली कुचुंबना,शेतकऱ्यांची बदललेली मूल्यव्यवस्था,त्यांच्या वाढत्या आत्महत्या,सहकारी चळवळीतील राजकारण व भ्रष्टाचार, वांग्मयीन चळवळीत शिरलेले राजकारण, वाढती महागाई या सर्व परिस्थितीत झालेला उद्रेक आपल्याला पुढील कादंबरीच्या लेखनातून पहावयास मिळतो.

झाडाझडती(१९९१) विश्वास पाटील यांची प्रकाशित झालेले कादंबरी धरणग्रस्तांच्या जीवनावर आधारलेली आहे.धरण बांधल्याने केवळ लोकच उध्वस्त होत नाहीत तर कुटुंब आणि गावे ही उध्वस्त होतात. त्यांना कायमच उपरेपणाची वागणूक मिळते.आर्थिक समृद्धीसाठी बांधलेले धरण हे जिवंतपणीच धरणग्रस्तांच्यासाठी मरण ठरते.सरकारी अधिकाऱ्यांची धोरणे, भ्रष्टाचार संधीसाधू नेते,धरणग्रस्त लोकांतील काही घरभेदी याविरुद्ध खैरमोड गुरुजी व धरणग्रस्ताने मिळून सरकारी व्यवस्थेवर दिलेल्या लढा अपूर्व आहे. कळप (१९९७) व तनकट (१९९८) राजन गवस यांनी या दोन कादंबऱ्या वेगळया ग्रामीण जीवन पार्श्वभूमीवर मांडलेले आहेत.कळप कादंबरीतील नायक रघु चिलमी हा बहुजन समाजातील असून तो शेतकऱ्यांच्या घरातील मुलगा आहे. देवदासी व साहित्य चळवळीत झोकून दिलेल्या या नायकाला कुठलातरी एक कळप केल्याशिवाय सुखाने जगता येत नाही व हीच आजच्या सामाजिक जीवनाची फलश्रुती आहे असे वाटते. तणकट ही कादंबरी म्हणजे राजन गवस यांच्या लेखनाचे केंद्रवर्ती सूत्र मांडणारी कादंबरी आहे.लेखकाची सामाजनिष्ठा, चळवळीतले दाहक अनुभव आणि भ्रमनिरास लेखकाची नैतिकता हे सर्व अनुभव मांडणारी आहे.गेल्या दोन-तीन दशकात राजकारण व समाजकारणातील दिशाहीनता देवदासीचा दुःख भोग हे सर्व प्रभावीपणे या कादंबरीत मांडले आहे.

अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट (२०११) या आनंद विंगकर यांच्या कादंबरीत एका शेतकरी जोडप्याच्या जीवनात आलेली आस्मानी व सुलतानी संकटा त्यामुळे त्याची झालेली होळपळ आणि संकटाला सामोरे जाण्याचे धैर्य किंवा अवसान गळाल्यामुळे त्यांनी कवटाळलेलं मरण अशी शोकांतिका चित्रित केली आहे.या कादंबरी विषयी विजय चोरमोर म्हणतात,परिस्थितीने गांजलेल्या एका कष्टकरी शेतकरी कुटुंबात अकस्मात घडलेली घटना आणि आस्मानी संकट सुन्न करत नाही तर मनात साकळून राहते.एकूणच उध्वस्त शेतकरी जीवनाचा खोल आलेख या कादंबरीत रेखाटलेला आहे.शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा,शासनाची उदासीनता व लहरी निसर्ग ही शेतकऱ्यांच्या आत्महत्येची मुळे शोधून काढणारी हि कादंबरी आहे. इथं होतं एक गाव (१९९०) या.रं.बोराडे यांनी या कादंबरीमध्ये लातूर जिल्ह्यातील किल्लारी भूकंपाची कहाणी विशद केली भूकंपात मोठ्या प्रमाणात वित्तहानी,मनुष्यहानी होतेच परंतु या लोकांविषयी शासन हे अस्मिता दाखवत नाही.उलट आलेल्या मदतीची लूट कशी केली जाते.समाजसेवी संघटना फक्त जाहिरातीसाठी कशा येऊन जातात यावर प्रकाश टाकला आहे. पानसळ (१९९४) गणेश आवटे यांच्या कादंबरीतून ग्रामीण तरुणाला नोकरी नसल्याने लग्नच करावेसे वाटत नाही. आज शिक्षण क्षेत्रातून सरकारने अंग काढून घेतल्याने तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालयाने निघाली परंतु विनाअनुदान धोरणामुळे अशा महाविद्यालयात नोकरी करणाऱ्या प्राध्यापकांचे होणारे आर्थिक शोषण, कुचंबना व होरपळ या कादंबरीतून स्पष्ट झाली आहे.ही पिढी शिक्षण घेते पण तिच्या हाती काही लागतेच असे नाही. बारोमास (२००२) सदानंद देशमुख यांनी आजच्या जागतिकीकरण या वातावरणात शेतकऱ्यांचे जीवन सतत कसे होरपळून चालले आहे यांवर प्रकाश टाकलेला आहे.ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची स्थिती लक्षात घेतल्यास खुल्या आर्थिक धोरणामुळे उद्ध्वस्त झालेल्या व ज्याला दैनंदिन जीवनात जगावेसे वाटत नाही असा शेतकरी आपल्यासमोर येतो आहे.या

शेतकऱ्याची अवस्था दयनीय झाली आहे.या कादंबरी मधील नायक एकनाथ उच्चशिक्षित असूनही नोकरी नसल्याने शेतीकडे वळतो तर त्याचा भाऊ मधु गुप्तधनाच्या शोधासाठी गुन्हेगारीकडे वळतो. निवडणुकीपूर्वी उमेदवार मतदारांना वेगवेगळी आश्वासने देतो पण निवडून आल्यावर त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो.हा सर्वच ग्रामीण शेतकऱ्यांचा प्रश्न बनला आहे.सदानंद देशमुख बाह्य वास्तवाच्या प्रतिकृतीचे चित्रण करतात तितक्याच ताकतीने माणसाच्या अंतर्मनाचाही वेध घेतात.यातूनच जागतिकीकरणामुळे शिक्षणाचा प्रसार खेड्यापर्यंत झाला पण ग्रामीण भागात सरकार नवीन योजना निर्माण करून न शकल्याने सुशिक्षित बेरोजगारांची समस्या निर्माण झाली.या कादंबरीत जागतिकीकरणाच्या परिणामातून उध्वस्त झालेले शेतकरी व शेती यांचे चित्रण दिसून येते.

समारोप

१०९० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीच्या प्रेरणा,स्वरूप आणि व्याप्ती याविषयी विवेचन करताना असे लक्षात येते की या दोन दशकात जागतिकीकरणाचा प्रचंड मारा झाला आहे.उद्योग,शिक्षण,कृषी या क्षेत्रातील प्रवेश रोखताच येत नाही.या विविध बदलांना सामोरे जाताना साहित्यिकांनी अनुभवाला आलेली विविध स्थित्यंतरे मांडलेली आहेत.जागतिकरणामुळे होणारा बदल जसा सामान्य माणूस झेलू शकत नाही तसाच लेखकालाही तो पकडता येत नाही.ग्रामीण साहित्यातून खेडी हद्द पार झाल्याचे विचित्र दृश्य दिसू लागले आहे.एकंदरीत या कालखंडात मराठी साहित्यामध्ये मराठी भाषा व साहित्याचा जागतिकीकरण ,बदलत्या खेड्यांचा व ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जीवनात झालेल्या बदलाचा वेध घेतला आहे.

निष्कर्ष

१.१९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीवर जागतिकीकरणाचा प्रभाव पडल्याचे दिसते.

२. जागतिकीकरणामुळे वेगवेगळ्या क्षेत्रात बदल व सुधारणा झाल्या पण याचा परिणाम ग्रामीण भागातील शेतकरी माणसांवर झाला.

३. बदलत्या जीवनशैलीच्या जाणीवांची संवेदनशील नोंद ग्रामीण साहित्यात झालेली दिसते.

४. गरीबीमुळे शेतकऱ्यांच्या मुलांना दुरापास्त झालेले शिक्षण पहावयास मिळते.

५. जागतिकीकरणाच्या लाटेमुळे प्रभावित झालेले राजकीय आणि सामाजिक जीवनातील बदलांविषयी एक सखोल जाण या ग्रामीण कादंबरीतून व्यक्त होते.

संदर्भ

१. श्री.विलास सुर्वे-१९९० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी.

२. डॉ. हरिश्चंद्र गायकवाड-जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव.